स्थापना : १९६४

हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

६१

# मासिक नवस्नेह

वर्ष ११ वे : अंक ४
जुलै २०२५

स्वागतमूल्य
₹. 30/-




प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# कोल्हापूर चित्पावन संघाचा ६१ वा वर्धापन दिन





कोल्हापूर चित्पावन संघाचा ६१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. केदार जोशी यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. तसेच डॉ. नंदकुमार जोशी व डॉ. राधिका जोशी यांच्या हस्ते केक कापण्यात आला. ह्या वर्धापन दिनाला शुभेच्छा देण्यासाठी सभासद, हितचिंतक व ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सारस्वत विकास महामंडळ, बी. बी. एस., परशुराम ना. सह. पतसंस्था, श्री. नितीन वाडीकर, सी ए रोहित परांजपे, मंदार फडके ह्यांनी प्रत्यक्ष येऊन शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, श्री. गजानन साने, सौ. संगीता आपटे, सौ. सीमा गोखले, श्री. दत्तात्रय आपटे, श्री. श्रीकांत लिमये, श्री. प्रसाद खाडिलकर, श्री. विष्णू वझे, श्री. मोहन दातार उपस्थित होते.

# कोल्हापूर चित्पावन संघाचा 'चित्पावन खाद्य महोत्सव'

नमस्कार चित्पावन बंधू आणि भगिनी !

मागील वर्षी आपण एक आगळा वेगळा प्रयोग केला; चित्पावन खाद्य महोत्सवाचा...! विद्यार्थी गुणगौरव आणि त्यानंतर आपल्या जीभेचे चोचले पुरवणारा आपल्याच चित्पावन बंधू आणि भगिनींनी केलेल्या चविष्ट खाद्यपदार्थांचा मस्त असा खाद्य महोत्सव...! मागील वर्षीचा सुखद अनुभव आणि आपल्या चित्पावनांची फर्माईश म्हणून यंदाही आपण चित्पावन खाद्य महोत्सवाचे आयोजन करीत आहोत.

चला तर मग पुन्हा एकदा आपल्यातील लपलेल्या शेफला जागं करूया...! आणि आपल्या अनोख्या खाद्यपदार्थांनी आपल्या आप्तस्वकीय चित्पावनाना तृप्त करूया...! चला खाद्य महोत्सव २०२५ साजरा करूया...! कोल्हापूर चित्पावन संघ व वुई फॉर अवर्स तर्फे आयोजित...

## चित्पावन खाद्य महोत्सव

**स्थळ : मंगलधाम हॉल, बिनखांबी गणेश मंदिर जवळ, कोल्हापूर**

**दिनांक : शनिवार, २६ जुलै २०२५ वेळ : संध्याकाळी ६.०० ते रात्री ९.००**

### चित्पावन खाद्य महोत्सव २०२५

१. यामध्ये प्रत्येकी एक स्टॉल देण्यात येईल. २. प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी दिली जाईल.

३. स्टॉलसाठी बुकिंग आवश्यक असेल. रुपये २००/- एका स्टॉलसाठी सहभाग शुल्क असेल.

४. फक्त चित्पावन कोकणस्थ सदस्यांना स्टॉल देण्यात येईल. ५. एका प्रकारच्या खाद्य पदार्थाचा एकच स्टॉल देण्यात येईल.

६. सर्व खाद्यपदार्थ सहभागी स्टॉल धारकांनी स्वतः बनवून आणायचे आहेत. ७. बाहेरून कोणाचाही तयार पदार्थ आणू नये.

८. खाद्यपदार्थांची किंमत रु. ५० पेक्षा जास्त असू नये. जेणेकरून सर्वांना त्याचा मनसोक्त उपभोग घेता येईल.

९. पदार्थ गरम करण्याचे साहित्य, देण्यासाठी डिश - चमचे इ. स्वतः आणायचे आहेत.

१०. मर्यादित स्टॉल असल्याने लवकरात लवकर बुकिंग करावे ही विनंती. बुकिंगची शेवटची तारीख १५ जुलै २०२५ आहे.

**अधिक माहितीसाठी व बुकिंगसाठी संपर्क :**

**श्री. निखिल जोग : ९८५०२०२३९८ श्रुती जोग : ९१५८५७०४१४**

**विशेष सूचना :** याच दिवशी या कार्यक्रमाआधी चित्पावन संघाच्या शैक्षणिक गुणगौरव उपक्रमा अंतर्गत बक्षीस वितरण समारंभ मंगलधाम येथे होणार आहे. यानंतर खाद्य महोत्सव होणार आहे. आणि या कार्यक्रमांत सहभागी सभासद, विद्यार्थी, सत्कारमूर्ती यांना प्रत्येक व्यक्तीस एक खाऊचे कूपन रु. ५०/- मोफत भेट देण्यात येईल.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक ४ : जुलै २०२५**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) संपादकीय /४
२) ऋतू बरवा – शरद /५ – वैदेही जोशी
३) भारताचा वॉटर स्ट्राईक आणि भातोडी पारगावची लढाई /७ – जगन्नाथ लडकत
४) आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख /८ – सीए. महेश दामले
५) सोपानदेवांची अलौकिक सोपानदेवी /१० – सौ. मंजुश्री गोखले
६) ज्ञानसूर्याची सावली /११ – सौ. मंजुश्री गोखले
७) ब्राह्मण आणि सरकारी अनुदान /१६ – श्रीकांत शिंत्रे
८) विविध गुणगौरव पुरस्काराची माहिती /१९
९) युद्ध फक्त सीमेवर लढले जात नाही /२०
१०) उत्तर एका गंभीर प्रश्नाचे /२१
११) शैक्षणिक पारितोषिक योजना २०२५ /२३
१२) शैक्षणिक अर्थसाहाय्य मागणीसाठी आवाहन /२४
१३) वधूवर माहिती यादी /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे, विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १३ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

मे महिन्यात वळवाचा म्हणत म्हणत पावसाळ्यासारखा पाऊस पडून शेवटी जून महिन्यात मान्सून आला, पण मला एक गोष्ट समजली नाही, की वैशाखात वैशाख वणवा सोडून आषाढासारखा पाऊस पडला. आणि आता मान्सूनचा पाऊस म्हणून पडतो आहे तो श्रावण सरीसारखा !

**क्षणात येते सरसर शिरवे**
**क्षणात फिरूनी ऊन पडे**

म्हणजे निसर्गाचं ऋतूचक्र चुकलंय की पावसाच्या कॅलेंडरमध्ये मे महिनाच नव्हता ! की देवाची गणती चुकलीय? पण काहीतरी चुकलंय एवढं खरं ! 'कुछ तो गडबड है दया !' असो. पण आता तरी जून-जुलैला तो शहाण्यासारखा पडू दे अशी अपेक्षा करूया. या पावसाचा ना काही नेम नाही. काही नियमितपणा नाही. पण आमचं तसं नाही हं ! आमचा नवस्नेह अगदी नियमित असतो, खरं ना? अर्थात आपण कुणीच पावसासारखे लहरी आणि निसर्गासारखे मनस्वी नाहीय !

**कुछ तो लोग कहेंगे,**
**लोगों का काम है कहना**
**छोडो बेकार की बातो में,**
**कही बीत ना जाए रैना**

हे आम्हाला चांगलं माहीत आहे. म्हणून तर आपल्या नवस्नेहमध्ये नेहमीच्या सदरांसोबत नवनवीन विषय आम्ही हाताळतो आणि तुम्हाला वाचायला देतो. आता या महिन्याच्या नवस्नेहमध्ये सुद्धा इन्कमटॅक्सच्या विवरणपत्राच्या माहितीसोबत 'भारतानं केलेला वॉटर स्ट्राईक' आणि इतिहास वाचूनही आपल्याला माहीत नसलेली 'भातोडी पारगावची लढाई' हे माहितीपूर्ण लेख आहेतच. त्यासोबतच युद्ध ही संकल्पना वेगळ्या पद्धतीनं स्पष्ट करणाराही एक लेख आहे. म्हणजे विविध विषयांवरचे विचारवंतांचे लेख आपल्या नवस्नेहमध्ये असतातच. आणि अगदी असाच दर्जेदार यंदाचा आपला दिवाळी अंकही असणार आहे. आणि त्यासाठी आपल्यातील लेखक मंडळींकडून दर्जेदार साहित्याची अपेक्षा आहे. मग पाठवता ना?

या महिन्यात आषाढी एकादशी आहे. कुठल्याही प्रलोभनाशिवाय, आमंत्रणाशिवाय लाखो लोक पंढरपूरला जमताहेत, तेही गेली ८०० वर्षे ! हा भक्तीचा महिमा आहे, श्रद्धेचा महिमा आहे, विश्वासाचा महिमा आहे, डामडौलात सगळ्यात गरीब असलेला विठूराया भक्तांच्या बाबतीत सगळ्यात श्रीमंत आहे. त्या भक्तीला, श्रद्धेला, विश्वासाला त्रिवार वंदन !

**चंद्रभागेच्या तिरी,**
**उभा मंदिरी,**
**तो पहा विटेवरी**
**विठ्ठल, विठ्ठल जय हरी ।।**

मित्रांनो, जुलै महिना झिम्म पावसाचा ! आपली, आपल्या लेकरांची, वृद्धांची प्रकृती सांभाळा म्हणजे आपल्या दिवाळी अंकाचा आस्वाद मनसोक्त घेता येईल ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# ऋतू बरवा... शरद

**''शारद सुंदर चंदेरी राती...**
**स्वप्नांचा झुलतो झुला...''**

हे गाणं आठवतय का मंडळी? नक्कीच आठवत असेल. कारण मराठी गीतसंगीत विश्वात अत्यंत गाजलेले हे शांताबाई शेळके यांचे गीत आशा भोसले यांनी आपल्या सुमधूर स्वरांनी आपल्या सर्वांच्या मनी खोलवर रुजवलय...!! अगदी बरोबर ओळखलत.

याच गीतातून आपल्याला ओळखू आलेला ऋतू आहे... शरद ऋतू!! पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळ्याचा त्रिवेणीसंगम म्हणजे शरद ऋतू !

शरद ऋतू हा रात्रींच्या सौंदर्याचा ऋतू आहे. आकाशातली निळाई हळूहळू स्पष्ट आणि गडद होते. 'तारांगण निरखावे शरदाच्या रात्रीच'. या रात्रीही मोठ्या असतात. इतर कोणत्याही ऋतूंना रात्रीच्या सौंदर्याचं हे वरदान नाही, म्हणून तर कालिदासाने या ऋतूतील रात्रींना 'ज्योतिष्मती रात्र' म्हटलं आहे !

पावसाळ्यानंतर जसजसा शरद ऋतू सुरू होतो, तसतसे पूर्वेकडून वारे वाहू लागतात. हे वारे पावसाळ्यातल्या काळ्या ढगांना वाहून दूर नेतात. आकाशात यत्र-तत्र पांढऱ्या ढगांचे पुंजके दिसतात. हलका पाऊस पाडणारे व मंद गडगडाट करणारे असे सूर्याच्या केशरी रंगाचे व शिळेच्या काळसर रंगाचे ढग अधूनमधून दिसतात. मात्र एकंदर आकाश स्वच्छ व निरभ्र होते. याच दिवसांमध्ये आकाशामध्ये अगस्ती ताऱ्याचा उदय होतो. वास्तवात आकाशात दक्षिण दिशेला जेव्हा अगस्ती तारा चमकू लागतो, तेव्हा वर्षा ऋतू संपल्याचे ते निदर्शक असते, असे आपली परंपरा सांगते..

उत्तर गोलार्धात शरद ऋतूचे महिने साधारणपणे सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर असतात. दक्षिण गोलार्धात मार्च, एप्रिल आणि जूनमध्ये शरद ऋतू येतो. शरद ऋतू हा वर्षातील एक ऋतू आहे, जो साधारणपणे आश्विन आणि कार्तिक या महिन्यांमध्ये येतो. हा ऋतू पावसाळ्याच्या (वर्षा) आणि हिवाळ्याच्या (हेमंत) ऋतूमध्ये येतो. विकिपीडिया नुसार, शरद ऋतूमध्ये दिवसाची लांबी कमी होते आणि तापमान थंड होऊ लागते. शरद ऋतूचं आणखी एक वैशिष्ट्य, ते म्हणजे तिन्ही ऋतूंचा त्यात झालेला संगम...

कवी अनिल यांनी शरद ऋतू वर लिहिलेली कविता, तुम्ही ही वाचली असेल...

**आभाळ निळें नि ढग पांढरे**
**हवेंत आलेला थोडा गारवा**
**कोवळी सकाळ मनमोकळी**
**धरातळी रंग एक हिरवा**

**साचून राहिल्या गढूळ पाण्याची**
**हळुहळुं झालीं निर्मळ जळें**
**काठावर उभ्या राहून बाभळी**
**वाकून पाहती रूप सावळे**

**टवटवलेली सारींच शेतें;**
**ज्वारीच्या कुसेत अधीर होत**
**टपोर गर्भ तान्ह्या कणसाचा**
**पान-आडोशात जन्मास येत**

**काळजी करते काळी माती कशी**
**अजून कपाशी नाही फुलली**
**चौकशी कराया पंख हलवीत**
**निळे तास पक्षी उतरती खाली**

**शेवंतीला कुणी उगीच सांगे,**
**इतक्यांत तुझी वेळ आली नाही**
**गवताचे सोने होण्याआधीच**
**पिवळ्या फुलांची नको करूं घाई!**

शरद ऋतूतील निसर्गाचे सौंदर्य हा एक मनमोहक आणि मंत्रमुग्ध करणारा अनुभव असतो. हा ऋतू आपल्याला निसर्गाच्या सौंदर्याची मुग्ध आठवण करून देतो.

निसर्गाच्या या सगळ्या सौंदर्याचा आनंद अनेकविध रूपांमधून आपल्यापर्यंत पोचत असतो. पारंपारिकपणे उत्तर गोलार्धात, शरद ऋतूतील महिने म्हणजे कापणीचा हंगाम !! उष्ण हवामानाच्या शेवटी पिके कापणीसाठी तयार होतात. कापणी महोत्सव म्हणूनही ओळखला जातो. अनेक राज्यांमधील विविध प्रकारची पिके, भाज्या, फळफळावळ, फुलं, वनस्पती

यांचा हा सुपिक अन् समृद्ध काळ... असे हे शारदीय महिने म्हणजे शरद ऋतूतील संक्रमणाचा काळ !! प्राचीन काळापासून ते धार्मिक विधी आणि उत्सवांनी साजरे केले जातात.

शरदात येणारे सणदेखील रात्रींशी निगडित आहेत. कोजागरी पौर्णिमा, त्रिपुरारी पौर्णिमा आणि दिवाळी हे रात्रीचेच उत्सव आहेत. पावसाळ्याच्या सत्तावीस नक्षत्रांपैकी तीन नक्षत्रं तरी शरद ऋतूत येतात. दसऱ्याला जेव्हा आपण शिलंगणाला जातो, तेव्हा गावाच्या सीमेवर येऊन बसलेलं 'हीव' शिलंगणावरून परत येताना आपल्यासोबत गावात, घरात येतं आणि हिवाळा सुरू होतो. अशी समजूत आहे. शरद ऋतूतील निसर्गाचे सौंदर्य एकतेची भावना जागृत करते, जीवनाच्या बदलत्या काळात आनंद अन् उत्साह देतो हा शरद ऋतू. या शारदीय उत्सवांचे रूप म्हणजे नवरात्र अन् कोजागिरी पौर्णिमा !

कोजागरी आणि शरद ऋतूचे नाते तर निरंतर. मस्त गुलाबी हवा, हवेत छान गारवा, स्वच्छ हवा अन आभाळभर टिपूर चांदणे अन् दुग्धविभोर चंद्र आणि आप्तस्वकीय आणि मित्रमंडळी समवेत जागवलेल्या त्या रात्री, लाजबाब !

लहानपणापासूनच्या कोजागरीच्या रात्री नजरेसमोर येतात. अगदी लहानपणी कोजागरी म्हणजे रात्री सगळ्यांनी एकत्र यायचे, मग हास्य विनोदाची उधळणं, कुठे गाण्याच्या भेंड्या तर कुठे विनोदी किस्से !! सगळ्यांनी एकत्र येऊन आनंद वाटून घेणं हा मानवी जीवनाचा अनुभवातीत पैलू.. 'को जागरती? को जागरती?' म्हणणाऱ्या लक्ष्मीला कायम 'अहम जाग्रामी' म्हटलेले आठवते. कोजागरीच्या रात्री पडणारे चंद्राचे तेज आरोग्यदायी असते. त्यामुळे चंद्रकिरणे पडलेले ते दूध प्राशन करणे आरोग्यदायी असते. कोजागरीची रात्र म्हणजे अशी उल्हासाची आनंदाची पर्वणी हे समीकरण मात्र अजूनही मनामनात घट्ट रुजलेले आहे. अशा या रात्रींचे वर्णन करायचे ठरवले तर नवरात्रातील नऊ दिवसांबरोबर रात्रीचे वर्णन करावे लागेल. कारण अत्यंत पवित्र अन् उत्साहाने साजरा होणार हा उत्सव आपल्या एकतेचे, शक्तीचे प्रतिक आहे. हा महत्त्वाचा मानबिंदू ठरेल शरद ऋतूचा!!

शरद ऋतू म्हणजे अंतर्मनाशी पुन्हा जोडले जाणे, स्वतःसोबत एकांतात वेळ घालवणे, आपल्यामध्ये आणि आजूबाजूला होणाऱ्या सर्व बदलांना स्वीकारणे, त्यावर चिंतन करणे. शरद ऋतू हा देखील समृद्धीचा काळ आहे.

अशा बदलत्या ऋतुचक्राचा मानवी आयुष्यावर परिणाम होतोच. म्हणूनच तर आपल्या आयुर्वेदात प्रत्येक ऋतू बदलाचा विशेष अभ्यास केला गेला आहे. बागा आणि शेते हंगामातील फळांनी भरलेली असतात. सफरचंद, भोपळे, नाशपाती, डाळिंब आणि असंख्य इतर फळे आणि भाज्या पिकतात, पिके कापणीसाठी तयार असतात. म्हणून आहार देखील तशाप्रकारचा घ्यावा हे सांगितले आहे. शरद ऋतूत आरोग्य सुधारण्यासाठी तूप आणि तिखट पदार्थ खावेत. त्याशिवाय गोड, हलका आहार, विविध फळांपासून तयार केलेले पेय यांचा समावेश करायला हवा. तांदूळ, मूग, गहू, बार्ली, दूध, दही, लोणी, तूप, श्रीखंड इत्यादींचे सेवन फायदेशीर ठरेल. भाज्यांमध्ये दूधी, फ्लॉवर, मुळा, पालक, आणि बीन्स यांचा समावेश करावा. फळांमध्ये डाळिंब, आवळा, कलिंगड, केळी आणि पपई फायदेशीर आहे. आवळा साखरेसोबत खाणे हे अधिक उत्तम ठरते. आवळ्यात लोह भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे लोहासोबत रक्त शुद्ध देखील होते.

या ऋतूत मोहरीचे तेल, दह्याने बनवलेले पदार्थ, बडीशेप, लसूण, वांगी, कारले, हिंग, काळी मिरी, उडीद यापासून बनवलेले जड पदार्थ खाणे टाळावे. याशिवाय खारट पदार्थ तसेच आंबट पदार्थ जास्त प्रमाणात खाऊ नयेत.

जीवनाच्या चक्रांबद्दल आपण विचार करून भविष्यासाठी स्वतःला तयार केले पाहिजे.फक्त मानवी जीवन नव्हे तर शरद ऋतूमध्ये आपल्याला पक्ष्यांचे स्थलांतर देखील दिसेल. याचा अर्थ असा की जे पक्षी थंड हवामानात टिकू शकत नाहीत ते हिवाळ्याच्या महिन्यांत उष्ण ठिकाणी स्थलांतर करतात. पक्षी सहसा स्थलांतर करण्यासाठी शरद ऋतूची निवड करतात.

या ऋतूतील नैसर्गिक सौंदर्य, वातावरण आणि भावना अनेक चित्रपटांमध्ये उत्कृष्टपणे दर्शविल्या जातात. तसेच, काही चित्रपट शरद ऋतूच्या सणांशी आणि विशिष्ट घटनांशी संबंधित असतात, ज्यामुळे ते प्रेक्षकांना अधिक आकर्षित करतात. म्हणून हा काळ

**पान २२ वर पहा...**

# भारताचा वॉटर स्ट्राईक आणि भातोडी पारगावची लढाई

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर शक्य त्या सर्व मार्गाने पाकिस्तानला जाळ्यात अडकवून अद्दल घडवण्यासाठी भारताकडून अनेक निर्णय घेण्यात आले. त्यापैकी एक म्हणजे १९६० साली झालेला सिंधू जल करार हा होय. हा करार स्थगित करून भारताने पाकिस्तानवर वॉटर स्ट्राईक केला.

या वॉटर स्ट्राईकवर आपल्याच काही मंद बुद्धीच्या लोकांनी शंका निर्माण करून संभ्रमाचे वातावरण निर्माण केले. परंतु त्यांना हे माहीत नाही की, सिंधू जल करार स्थगित केल्याने त्याचे जे परिणाम आता पाकिस्तानला भोगावे लागत आहेत. हळूहळू पाकिस्तानच्या घशाला कोरड पडते आहे आणि पाकिस्तान थेंबा-थेंबाला तरसणार आहे. यामुळे पाकिस्तानात खळबळ उडाली आहे.

पाकिस्तानच्या शेती उत्पादनाचा ७० टक्के भाग पश्चिम पंजाबचा आहे. पंजाबची शेती बहुतांशी सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांवर अवलंबून आहे. १९६० पासून आजवर या नद्यांतील भारताच्या वाट्यातील ८० टक्के पाणी आपण न वापरता पाकिस्तानला बहाल करत होतो. पाकिस्तान सिंधू नदी प्रणाली प्राधिकरणाने भारताच्या या वॉटर स्ट्राईक वर चिंता व्यक्त केली आहे. करार स्थगित झाल्याने आता पाणी प्रवाहाची पूर्वसूचना देण्याची गरज नाही. त्यामुळे पाकिस्तानला पूर आणि दुष्काळ अशा दोन्ही संकटांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पाकिस्तानची आर्थिक आणि कृषी व्यवस्था हादरली आहे.

सुरुवातीला भारत सरकारने पाणी रोखल्याने चिनाब नदीची पाण्याची पातळी खाली पोहोचली तळ दिसू लागला. चिनाब नदी पायी चालत पार करताना नागरिक दिसत होते. गेल्या कित्येक वर्षात नागरिकांनी चिनाब नदीला अशा अवस्थेत पाहिलेलं नाही आणि आता ७ मे रोजी भारताने चिनाब नदीवरील दोन धरणांचे दरवाजे उघडले त्यामुळे चिनाब नदी मधून २८ हजार क्युसेक पाणी सोडले. ज्यामुळे पाकिस्तानात पूर अलर्ट जारी झाला. नदीच्या जलस्तरात अचानक वाढ झाल्याने पाकिस्तानातील अनेक भाग हे जलमय झाले.

आणि मला यावेळी आठवण झाली ती १६२४ मध्ये झालेल्या भातोडी पारगावच्या इतिहास प्रसिद्ध लढाईची.. अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्यापासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या व जामखेड रोडवरील नगर तालुक्यातील भातोडी पारगाव हे गाव.. मलिक अंबरच्या नेतृत्वाखाली झालेल्या या लढाईमध्ये शहाजीराजे भोसले यांनी मोठी कामगिरी बजावून मोठा विजय मिळविला होता. यादरम्यान शरीफजीराजे भोसले यांना मोगलांच्या विरोधात लढाई करताना वीरमरण आले होते. त्यांचे समाधी स्थळ भातोडी गावात आहे. ही लढाई इतिहासातील मोठी लढाई समजली जाते कारण या लढाईत अतिशय चतुराईने शरीफजीराजे भोसले यांनी तलाव फोडून हजारो मोगलांना जमिनीत गाडले होते. याला म्हणतात वॉटर स्ट्राईक...!

**- जगन्नाथ लडकत**

मोबा. ९४२२०२७७४४

**लेखकांना सूचना**

नवस्नेह मासिकाचा दिवाळी अंक १० ऑक्टोबर रोजी प्रकाशित होत आहे. कृपया लेखकांनी आपले साहित्य ऑगस्ट महिन्याअखेर पाठवून सहकार्य करावे, ही विनंती. मजकूर सुवाच्च अक्षरात कागदाच्या एका बाजूस लिहिलेला असावा. अथवा ऑनलाईन मजकूर व्हॉटस्ॲप क्र. ७६२०५४६२२५ वर शक्यतो Text Message Type मध्ये अथवा word file (Unicode or Shree Lipi) मध्ये पाठवावी.

# आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख आणि आवश्यक कागदपत्रे

खालील लेखामध्ये आर्थिक वर्ष २०२४-२५ (मूल्यांकन वर्ष २०२५-२६) साठी आयकर विवरणपत्र (ITR) भरण्याची अंतिम तारीख व त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली आहे.

करदात्यांनी विवरणपत्र वेळेत व अचूक भरण्यासाठी ही कागदपत्रे पूर्वतयारीस ठेवणे आवश्यक आहे. यामुळे परतावा लवकर मिळतो आणि दंडाची शक्यता टाळता येते.

मूल्यांकन वर्ष (Assessment Year) म्हणजे उत्पन्नावर कर भरायचे वर्ष वित्तीय वर्ष (Previous Year) म्हणजे ज्यावर्षी आपण उत्पन्न कमावतो. उदा. वित्तीय वर्ष २०२४-२५ मधील उत्पन्नासाठी मूल्यांकन वर्ष २०२५-२६ असेल. वित्तीय वर्ष २०२४-२५ (मूल्यांकन वर्ष २०२५-२६) साठी आय.टी.आर. भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ (CBDT) ने २७ मे २०२५ रोजी जारी केलल्या परिपत्रिकानुसार ऑडिट आवश्यक नसलेल्या करदात्यांसाठी आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ वरून वाढवून १५ सप्टेंबर २०२५ करण्यात आली आहे.

ही मुदतवाढ एक महत्त्वाची संधी असून प्रत्येक करदात्याने आपली कागदपत्रे पूर्ण करून नियोजनपूर्वक आणि वेळेत विवरणपत्र भरावे, जेणेकरून उशीराचा दंड व व्याज यांपासून बचाव करता येईल.

**अंतिम तारीख खालीलप्रमाणे –**

- ऑडिट नसलेल्या करदात्यांसाठी १५ सप्टेंबर २०२५
- ऑडिट आवश्यक असलेल्या करदात्यांसाठी १५ ऑक्टोबर २०२५
- निर्दिष्ट आंतरराष्ट्रीय व्यवहार (Transfer Pricing Reports) असलेल्या करदात्यांसाठी ३० नोव्हेंबर २०२५
- उशिरा (Belated) / सुधारित (Revised) विवरणपत्रासाठी ३१ डिसेंबर २०२५

**आय.टी.आर. साठी आवश्यक महत्त्वाची कागदपत्रे**

- आधार कार्ड व पॅन कार्ड
- बँक खाते विवरण (१ एप्रिल २०२४-३१ मार्च २०२५)
- पगार प्रमाणपत्र – Form 16
- गृहकर्ज व व्याज तपशील
- कलम 80C अंतर्गत गुंतवणूक (PPF - LIC etc.)
- आरोग्य विमा हप्ता – कलम 80D
- भांडवली नफा व त्याचे तपशील
- भाड्याने दिलेल्या मालमत्तेचे उत्पन्न
- एफडीवरील व्याज, डिव्हिडंड इ.
- मागील वर्षाचा आय.टी.आर. (जर आवश्यक असेल)
- Form 26 AS, AIS आणि TIS चे विवरण व सामंजस्य

**महत्त्वाचे :–**

आय.टी.आर. वेळेत भरल्यास नुसता दंड वाचतो असे नाही तर कर्ज मिळणे, व्हिसा अर्ज प्रक्रिया, आर्थिक साक्षरता दर्शविणे इ. बाबतीतही मदत हेते.

**विलंब शुल्क आणि व्याज – कायदे व दंड :–**

कलम 234F अंतर्गत विलंब शुल्क

- रु. ५००० – जर उत्पन्न एकूण रु. ५ लाखांपेक्षा जास्त असेल.
- रु. १,००० – जर उत्पन्न रु. ५ लाखांपर्यंत असेल.

कलम 234 A अंतर्गत कर थकबाकीवर दर महिन्याला १% व्याज लागू होते.

**Belated Return म्हणजे काय?**

- १५ सप्टेंबरनंतर ITR भरायचे असल्यास ते उशिराचे विवरणपत्र (Belated Return) म्हणतात.
- अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५
- दंड आणि व्याज लागू होतो.
- नुकसान पुढे नेता येत नाही.
- Deduction / Exemption घेतले जाऊ शकतात.

**Updated Return म्हणजे काय?**

३१ डिसेंबरनंतरही जर विवारणपत्र भरले गेले नसेल, तर विशिष्ट अटींसह Updated Return (ITR U) भरता येते.

**Revised Return म्हणजे काय?**

- मूळ ITR मध्ये चूक झाल्यास ती दुरुस्त करण्यासाठी भरता येते.
- अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५

**नुकसान समायोजन – योग्य वेळेवर विवरणपत्र का महत्त्वाचे?**

शेअर्स व्यवसाय, मालमत्ता इत्यादींमधील तोटे पुढील वर्षात समायोजित करता येतात. परंतु आय.टी.आर. उशिरा भरल्यास हे फायदे उपलब्ध होत नाहीत.

**व्यावसायिक सल्ला :–**

सर्व करदात्यांनी आपल्या चार्टर्ड अकाऊंटंटचा सल्ला घेऊन, नियोजनपूर्वक व वेळेत आय.टी.आर. भरावे. त्यामुळे दंड, व्याज आणि व्यावहारिक अडचणी टाळता येतील. वेळेवर आय.टी.आर. भरल्यास आर्थिक व्यवहार, कर्ज, व्हिसा प्रक्रियेस मदत होते.

**– सीए. महेश दामले**
मोबा. ९१५६३५७७८९


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

गुरुवार, दि. 24 गुरुपुष्यामृत


आपलं दुकान

महाद्वार रोडवर, 0231–2546585


**दिनविशेष (जुलै २०२५) विश्वावसूनाम संवत्सरे**
**आषाढ - श्रावण १९४७**

सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे। साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**



**मंगळवार दि. १ :** महाराष्ट्र कृषी दिन, डॉक्टर्स डे, सीए डे, **शनिवार दि. ५ :** जागतिक सहकार दिन, **रविवार दि. ६ :** आषाढी एकादशी, ताबूत विसर्जन, चातुर्मासारंभ, **बुधवार दि. ९ :** बेंदूर, **गुरुवार दि. १० :** गुरुपौर्णिमा, **शुक्रवार दि. ११ :** जाग. लोकसंख्या दिन, **सोमवार दि. १४ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.५७), **सोमवार दि. २१ :** कामिका एकादशी, **मंगळवार दि. २२ :** संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा, **गुरुवार दि. २४ :** अमावास्या, गुरुपुष्यामृत, **शुक्रवार दि. २५ :** श्रावण मासारंभ, **मंगळवार दि. २९ :** नागपंचमी, जागतिक व्याघ्र दिन, **गुरुवार दि. ३१ :** भगवान पार्श्वनाथ निर्वाण दिन, छ. राजाराम महाराज जयंती, नाना शंकरशेठ पुण्यतिथी, संत तुलसीदास जयंती.

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ७ : ज्ञानयोग**

श्री भगवानुवाच ।

**सर्वांसी प्रगट नाही । योगमायेने वेष्टिले पाही ।**
**अज अव्यय असोनही । मूढ लोक नेणती मज ।।**
व़ेढिलों योग–मायेने अंधार चि जगास मी
अजन्मा नित्य मी कैसा मूढ कोणी न
ओळखे।।२५।।

**पूर्वी जी जाली भूतें । आतां वर्तमान जें वर्तते ।**
**भविष्यही मज अवघे कळतें । लोक नेणती**
**अर्जुना।।**
झाली जी जी हि होतील भूते आजही आज जी
सगळी जाणतों ती मी मज कोणी न
जाणती।।२६।।

**इच्छा द्वेषापासून । दुष्ट मोहो उपजला तेथून ।**
**ते भूतसृष्टीचे आदि जाण । मोहाते पावती**
**अर्जुना।।**
राग–द्वेषांमुळे चित्ती जडला द्वंद्व–मोह जो
संसारी सगळी भूते त्याने मोहूनि टाकिली।।२७।।

**ज्याचे कां पाप गेले ।**
**ते द्वन्द्व मोही निर्मुक्त जाले ।**
**ते माझे भजनी रिघाले । दृढ बुद्धि करूनी ।।**
ज्यांनी झिजविले पाप पुण्य–कर्मे करूनिया
ते द्वंद्व–मोह तोडूनि भजती मज निश्चये ।।२८।।

**जरा मरण नाशार्थी । माझे ध्यांनी यत्न करिती ।**
**ते सर्व ब्रह्म जाणती । कर्म अध्यात्म अवघे ।।**
झटती आश्रये माझ्या जरा–मृत्यू गिळावया
ते ब्रह्म जाणती पूर्ण तसें अध्यत्म कर्म हि ।।२९।।

**आधीभूत आधी दैवत माझ्या ठायी । जाणती आधी यज्ञही । मरण काळी मज जाणितले पाही ।**
**योग मुक्त ते जाले ।।**
अधिभूताधिदैवांत अधियज्ञांत जे मज
देखती ते प्रयाणी हि जाणती मज सावध ।।३०।।

**इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्याय: ।।७।।**

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक त्रेचाळिसावा)

दोन दिवस असेच गेले. रोजचं दैनंदिन कामकाज सगळ्यांचंच चालू होतं; पण तरीही मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी रुखरुख होती. संदिग्धता होती. अनिश्चितता होती. अशांतता होती. तरीही रोजचा सराव, रोजचा अभ्यास, रोजची उजळणी चालूच होती. निवृत्ती-ज्ञानेश्वर-सोपान रोज पहाटे ब्राह्ममुहूर्तावर उठून गंगेच्या घाटाच्या पलीकडच्या जंगलात जात असत. रोजचा सराव, उजळणी करत असत. या दोन दिवसांत विशेष काही घडलं नाही.

तिसरे दिवशी पुन्हा चौघं भावंडं धर्मसभेत गेली. सोमणशास्त्र्यांना भेटली. यांनी धर्मसभेत प्रवेश केल्यावर काही जणांनी भुवया चढवल्या. काही जणांनी आठ्या घातल्या; पण प्रत्यक्ष बोललं कुणीच नाही. चौघे जण आलेली पाहताच सोमणशास्त्रींनी निवृत्तीला बोलावलं. तो धर्मपीठासमोर जाऊन उभा राहिला. सोमणशास्त्री म्हणाले, ''हे बघ, आम्हाला कुणालाच तुमच्या प्रश्नाचं उत्तर सापडलं नाही. कोणत्याही धर्मग्रंथात सापडलं नाही आणि शास्त्राधार ज्याला नाही असा कोणताही निर्णय आम्ही घेऊ शकत नाही, कारण शास्त्रार्थ बदलण्याचा वा नवीन बनवण्याचा आम्हाला अधिकार नाही. तो अधिकार पैठणच्या धर्मपीठाला आहे. तेव्हा तुम्ही तिथंच जा आणि तिथं आचार्य बोपदेव आहेतच. त्यांना सगळी पार्श्वपीठिका विदित आहेच. तेच तुमच्या या प्रश्नावर तोडगा काढतील. तेव्हा तुम्ही भावंडं पैठणलाच जा आणि तिथंच तुमच्या प्रश्नांची उत्तरं मिळवा.'' सोमणशास्त्रींनी सांगितलं आणि तिथं जमलेल्या ब्रह्मवृंदानं सुटकेचा श्वास सोडला.

आता हे सोमणशास्त्रींनी खरंच सांगितलं होतं की ब्रह्मक्षोभ टाळण्यासाठी कुणास ठाऊक? पण पैठणला जावं लागणार, हे निश्चित झालं आणि चौघं घरी परतली. ''हे असं काहीतरी होणार, असं मला वाटतच होतं. आक्षेप टाळण्यासाठीच हे असं सांगितलं असणार !'' सोपानानं आपल्या मनात खदखदणारी भावना बोलून दाखवली. निवृत्तीदादा काही बोलला नाही. ज्ञानेश्वरानं मात्र संमतिदर्शक मान डोलावली. मुक्ताच्या नाकाच्या शेंड्यावर जमा झालेला राग तिच्या डोळ्यातही उतरला होता. तोच पुन्हा सोपान पुढे म्हणाला, ''दादा, खरं सांगू? एका परीनं हे झालं ते बरंच झालं ! तुम्ही काय, ज्ञानादादा काय, तुम्ही साक्षात ज्ञानसूर्य आहात आणि आळंदीच्या ब्रह्मवृंदांकडून आपण अनुमती मागणं, म्हणजे साक्षात सूर्यानं उगवण्यासाठी चंद्राची अनुमती मागण्यासारखं आहे. सूर्यानं उगवण्यासाठी आकाशाचीच अनुमती घेणं उचित आहे. तेव्हा पैठणक्षेत्री जाऊन तिथल्या धर्मपीठातून आपण अनुमतिपत्र आणू !'' सोपानाच्या या बोलण्याला ज्ञानेश्वरानं दुजोरा दिला. ''खरं आहे सोपाना तू म्हणतोस ते ! पैठण क्षेत्रातूनच आपल्याला अनुमतिपत्र मिळालं की, इथल्या ब्रह्मवृंदाच्या अनुमतीची गरजच असणार नाही आणि पैठणच्या धर्मपीठाचा निर्णय त्यांना मानावाच लागेल ! खरं ना दादा?'' ज्ञानेशानं निवृत्तीदादाची साक्ष काढली. मग मात्र निवृत्तीदादा म्हणालाच, ''ठीक आहे. आपण लवकरात लवकर पैठणला प्रस्थान करू आणि बोपदेवाचार्यांना भेटून साद्यंत हकिकत विदित करू ! ठरलं आता ! परंतु तोवर आपला विद्याभास चालूच राहील. सोपाना, उद्याच तुला मी वेदाभ्यास शिकवण्यास प्रारंभ करेन. एका परीनं हे बरंच झालं!'' असं बोलून निवृत्तीदादा क्षणभर थांबला आणि

त्याच्या काहीतरी लक्षात आलं. तो लगेच पुढं म्हणाला, ''ज्ञानेशा, एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का? आपल्या सोपानाला आता अर्थ आणि अन्वयार्थ लगेचच समजू लागलेत आणि घडल्या गोष्टीची पूर्वपीठिका आणि उत्तरपीठिका यांचा संयुक्तपणे विचार करून तो आता त्यातून निष्कर्षही काढू लागलाय !'' दादाचं बोलणं ऐकून सोपान संकोचला; पण ज्ञानेश्वर मात्र म्हणाला, ''होय दादा, तुम्ही जसा जसा त्याचा विद्याभ्यास घेऊ लागला आहात, तशी त्याची बुद्धी आणि प्रतिभा दोन्हींची व्याप्ती वाढलीय आणि अभिव्यक्तीही !'' आपल्या प्रशंसेने संकोचलेला सोपान तिथून उठला आणि झोपडीत गेला. मुक्ता मात्र तिन्ही भावांकडे कौतुकानं बघत होती.

दुसरे दिवशी सकाळी सोपानाला अगदी लवकर जाग आली. त्यानं आन्हिक उरकलं. निवृत्तीदादा, ज्ञानादादा आणि मुक्ता अजून निजलेच होते. आन्हिक उरकून सोपान बाहेर पडला. झपझप चालू लागला. गाव मागे पडलं, गंगेचा घाट मागे पडला. सोपान जंगलाच्या रस्त्याला लागला. अगदी गाढ शांतता होती. अवघं गाव, इंद्रायणीचं पाणी, कठाचं वाळवंट, झाडं, वेली, पाखरं सगळी गाढ निद्रेत होती. कुणी कुणी जागं नव्हतं. अवघं चराचर शांत निजलं होतं आणि सात-आठ वर्षांचा हा सोपान त्या नीरव शांततेला जराही धक्का न लावता, गाढ निजलेल्या त्या चराचराला जराही चाहूल न देता, आपल्या पावलांचा जराही आवाज होणार नाही, याची काळजी घेत, तरीही झपझप पावलं टाकत चालला होता. त्याचं सगळं लक्ष, सगळे विचार, सगळं अवधान आज दादा शिकवणार असलेल्या वेदाभ्यासाकडे होतं. रोज पहाटे तिघेही विद्याभ्यास करायला बसले की, दादा सर्वप्रथम उजळणी घ्यायचा. आधी शिकवलेलं त्याला आणि ज्ञानेश्वराला कितपत आकलन झालंय, कितपत मुखोद्‌गत झालंय, याची चाचपणी करायचा आणि त्यानंतर नवीन विद्याभ्यासाला सुरुवात व्हायची; पण दादा आज वेद शिकवायला सुरुवात करणार होता. सोपानाला या विचारानंच लवकर जाग आली होती. त्याचं मन रोमांचित झालं होतं. उत्सुक झालं होतं. आसुसलं होतं.

वेद म्हणजे ज्ञानाचा सागर आहे, हे तो ऐकून होता; पण आजपासून त्याची वेदांशी ओळख होणार होती. वेदांतील ओळींना, श्लोकांना 'ऋचा' म्हणतात, हे त्यानं ऐकलं होतं.'ऋचा' ही संज्ञाच त्याला फार आवडली होती आणि त्याच ऋचा दादा आज शिकवणार होता. सोपान रोमांचित होता, उत्साहित होता, आसुसला होता. ते स्थान आलं. त्यातल्या त्याच्या नेहमीच्या दगडी बैठकीवर सोपान जाऊन बसला. दादा ज्या आसनावर बसायचा, त्या आसनाला त्यानं वंदन केलं आणि उजळणीला सुरुवात केली.

**''ॐ भूर्भुव:स्व: ।**
**तत्सवितुर्वरेण्यं ।**
**भर्गो देवस्य धीमहि ।**
**धियो यो न: प्रचोदयात् ।।''**

गायत्रीनं त्यानं पठणास सुरुवात केली. गायत्रीच्या १०८ मात्रा झाल्या आणि पातंजल-भ्याष्यातील उच्चार शुद्धीचा आरोह, अवरोह, उदात्त, अनुदात्त आणि स्वरित या आघातांचे महत्त्व सांगणारा श्लोक त्यानं म्हणायला सुरुवात केली. निवृत्तीदादाने त्याला समजावलं होतं, की मुखोद्‌गत ज्ञानामध्ये उच्चाराला, स्वराघाताला फार महत्त्व आहे आणि हे सांगणारा पातंजलभ्याष्यातील हा संदर्भही त्यानं सांगितला होता. सोपानानं त्याचे उच्चारण सुरू केलं

**एक: शब्द: स्वरतो वर्णतो वा**
**मिथ्याप्रयुक्त: स तमर्थमाह ।**
**स वाग्वज्रं यजमानं हिनस्ति**
**यथेन्द्रशत्रु: स्वरतोऽपराधात् ।।**

(शब्द, स्वर अथवा वर्ण यांचा उच्चार

चुकीचा अथवा खोटा केला, तर त्याचा अर्थ बदलतो आणि ज्या कार्यसिद्धीसाठी हे कर्म केलं जातं ते कार्य सिद्धीस न जाता त्याचा उलटा परिणाम होतो.)

त्याच्या त्या उच्चारणातले स्वराघात, आरोह, अवरोह, उदात्त, अनुदात्त, स्वरित, स्वरसंकोच हे सारं-सारं तो अगदी नेमकं आणि शुद्धतेनं उच्चारत होता. वाणी-वैखरीचं सामर्थ्यच त्यातून प्रतीत होत होतं. ते शुद्ध उच्चारण झालं आणि गीतेच्या पठणाला सुरुवात केली.

**''धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ।।**
**दृष्ट्वा तू पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।**
**आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ।।''**

गीतेचे शुद्ध स्वर त्या वातावरणात भरून राहिले आणि अवघं वातावरण गीतामय झालं. सोपानाच्या उच्चारांचा प्रतिध्वनी झाडांतून, पानांतून, मातीतून, अवकाशातून, क्षितिजातून, दिशादिशांतून उमटत राहिला. तो अवघा परिसर जणू कुरुक्षेत्र बनला होता. झाडं, पानं, फुलं, गवताची पाती ही जणू सैन्य बनली होती. निळ्या आकाशातला चंद्र आणि चांदण्या दशावतारी सुमूखं होती आणि या भारलेल्या वातावरणात, या मंगलमय बनलेल्या चराचरात सोपानाचा स्वर एक वेगळी अनुभूती घेऊन झंकारत होता. खरंतर हे उच्चारण रोजचंच होतं. रोजच अवघी सृष्टी हे सगळं ऐकत होती; पण आज सोपानाच्या उत्साहाला उधाण आलं होतं, मन अत्यंत प्रसन्न होतं. हृदय रोमांचित होतं. स्वरात आवाहन होतं. उच्चारात आव्हान होतं. ध्वनीत आर्तता होती. विचारात उत्कटता होती आणि हे सारं-सारं ऐकण्यासाठी अवघं चराचर लक्षलक्ष कान देऊन ऐकत होतं. सोपानाचं गीतेचं उच्चारण संपत आलं आणि निवृत्तीदादा आणि ज्ञानेश्वर तिथं पोहोचले. त्यांनी जंगल-झाडीत प्रवेश केल्यापासूनच भारलेलं वातावरण त्यांच्या लक्षात आलं होतं. त्या जंगल-झाडीतल्या हवेत, पाना-पानांत, दवबिंदूंच्या मोत्यात तो स्वर निनादत होता. गुंजत होता. अंथरुणावर सोपान नाही, हे जेव्हा निवृत्तीनं पाहिलं, तेव्हाच सोपान विद्याभ्यासासाठी गेला असणार, याचा त्याला अंदाज आला. त्याने तो ज्ञानेशाला बोलूनही दाखवला. त्यानंतर दोघं जण तत्परतेनं आन्हिकं आटोपून जंगल-झाडीच्या रस्त्याला लागले. वाट चालू लागले आणि जंगल-झाडी रस्त्यापर्यंत आल्यावर मात्र ते भारलेलं वातावरण, ती शहारलेली गवताची पाती, ती थरथरणारी पानं-फुलं, हे पाहिल्यावर त्यांची खात्रीच पटली, की सोपान इथं आला आहे आणि त्या ज्ञानसाधनेच्या स्थानी आल्यावर सोपानाला पद्मासनात बसून गीता पाठांतर करताना बघून त्याला सोपानाचा विलक्षण अभिमान वाटला.

गीतेचा अठरावा अध्याय संपला -

''इति श्रीमद्भगवद्गीता सूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे 'मोक्षसंन्यासयोगे'
नाम अष्टदशोऽध्यायः ।।''

(क्रमशः)

**- सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग ६**

आत्तापर्यंत आपण अमृतच्या वेगवेगळ्या योजना बघितल्या. त्यातील खाली दिलेल्या बहुतांश योजना, शिक्षणाकरता/नोकरीकरिता कौशल्य मिळवणे या करिता अर्थसहाय्य / प्रोत्साहन देणाऱ्या होत्या.

१) AIMS, IIT, IIIT, IIM या संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य,

२) UPSC / MPSC च्या परीक्षांकरता प्रोत्साहन

३) शासकीय संगणक टंकलेखन / लघुलेखन परीक्षा प्रोत्साहन

४ ) ड्रोन ऑपरेटर रिमोट पायलट प्रशिक्षण

५) तांत्रिक रोजगारक्षम प्रशिक्षण (ITGR)

६ ) माहिती ततंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनक्स तसेच उच्च कार्यक्षमता संगणक प्रशिक्षण

**फक्त खालील योजना ह्या व्यवसाय / उद्योग सुरू करण्याकरता होत्या.**

१) कृषी उत्पादन आधारित उद्द्योग सुरू करण्याचे प्रशिक्षण

२) व्यवसाय / उद्द्योग इन्क्युबेशन सेन्टर

अर्थात अमृतने वरील नवीन धंदा / व्यवसाय करणाऱ्या लोकांचाही आणखी विचार केला आहे. वरील लोकांकडे फक्त नवीन कल्पना असून भागत नाही, तर धंदा / व्यवसाय काय करायचा, कुठे करायचा, केव्हा करायचा, कसा करायचा? वगैरे गोष्टींचा आराखडा तर लागतोच, जो त्यांना वरील प्रशिक्षणातून मिळतो. तर दुकानाची जागा/ गाळा, माल, यंत्रसामग्री घेणे, नोकरवर्ग नेमणे, धंदा सुरू करण्याकरता आवश्यक अशा वेगवेगळ्या परवानग्या मिळवणे याकरता खर्च करायला लागतो आणि त्याकरता भांडवल लागते. या लोकांना वित्त संस्थांकडे कर्जासाठी जावे लागते. या कर्जावर अर्थातच व्याज आकारले जाते. ज्यामुळे या नवउद्योजकांचा खर्च वाढतोच आणि आजच्या स्पर्धात्मक युगात स्पर्धा करणे कठीण होते. कारण एकीकडे विक्री किंमत वाढवता येत नाही आणि दुसरीकडे खर्च जास्त होत असतो. अशा परिस्थितीत ‘अमृतने खालील योजना सुरू करून, मदतीचा हात पुढे केला आहे, जेणेकरून उद्योजकांना द्यावे लागणारे सर्व व्याज परत मिळेल. म्हणजेच शून्य व्याजाने कर्ज उपलब्ध होईल .

**अमृत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (नव उद्योजकांकरता)**

**योजनेचा उद्देश :** खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळा मार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित गटातील जे उमेदवार स्वत:चा उद्योग / व्यवसाय सुरु करू इच्छितात.

**योजनेचा लक्ष गट :** खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळा मार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित गटातील जे उमेदवार स्वत:चा उद्योग / व्यवसाय सुरू करू इच्छितात.

**लाभार्थी निवड निकष :**

१. अर्जदार अमृत संस्थेच्या लाभार्थी निकषांची पूर्तता करणारा असणे बंधनकारक.

२. अर्जदाराकडे उद्योग / व्यवसायासाठी आवश्यक सर्व वैध परवाने (Valid licenses), उद्यम आधार प्रमाणपत्र इत्यादी असणे आवश्यक आहे.

३. उद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले असल्यास त्याच्या प्रमाणपत्राची स्वस्वाक्षरीत प्रत जोडावी

४. अर्जदाराचे उद्योग व्यवसायाच्या TN/PN कार्डची स्व स्वाक्षरीत (Self-Aattested) प्रत.

५. अर्जदाराचे बँक खाते आधार लिंक असणे अनिवार्य राहील.

६. अर्जदार कोणत्याही बँकेचा / वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**योजनेच्या इतर अटी व शर्ती :**

१. अर्जदाराने कर्ज प्रकरण भारतीय रिझर्व्ह बँकेने

उद्योग / व्यवसाय प्रयोजनासाठी कर्ज परवाना दिलेल्या राष्ट्रीयकृत बँका / सहकारी बँका / जिल्हा मध्यवर्ती बँका / शेड्युल बँका / खाजगी बँका इ. वित्तीय संस्था यांचेकडे करणे आवश्यक राहील.

२. या योजनांतर्गत लाभार्थ्यांना वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना / परशुराम गट व्याज परतावा योजना यापैकी केवळ एक योजनेचा लाभ घेता येईल.

३. लाभार्थ्याने नियमितपणे सव्याज कर्जफेड करणे आवश्यक, नियमित कर्जफेड होत नसल्यास व्याज परतावा दिला जाणार नाही.

४. अमृत संस्थेच्या आर्थिक विकासाकरिता स्वयंरोजगारास प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून स्वावलंबी बनविणे व कृषी उत्पन्न आधारीत उद्योग सुरू करण्याचे प्रशिक्षण या दोन योजने मध्ये सहभाग घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**अर्ज करण्याची पध्दत :**

इच्छुक अर्जदारांनी योजनेच्या लाभासाठी अमृतच्या संकेतस्थळावर www.mahaamrut.org.in ऑनलाईन अर्ज करावा. त्यासोबत आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज अपलोड करावेत. तसेच, अर्जाची हार्ड कॉपी स्वाक्षरीत करून त्यासोबत आवश्यक सर्व दस्तऐवज / कागदपत्रे स्व स्वाक्षरीत (Self-attested) करून अमृतच्या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

**लाभाचे स्वरूप :**

१. बँकेने दिलेल्या कर्जाच्या EMI Statement मधील वेळापत्रकानुसार लाभार्थ्याने कर्जाचे हप्ते वेळेवर व नियमितपणे भरल्यास, कर्जावरील केवळ व्याजाची रक्कम(बँकेने आकारलेला व्याजदर अथवा योजनेतील उच्चतम अनुज्ञेय व्याज परतावा दर मर्यादा १२ टक्के, यापैकी जे कमी असेल त्या मर्यादेत) लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक बचत खात्यात जमा केली जाईल.

२. लाभार्थ्याने बँकेकडून व्यवसाय / उद्योग यासाठी घेतलेल्या कर्जावरील केवळ व्याजाची रक्कम अनुज्ञेय उच्चतम मर्यादेत अमृत द्वारा लाभार्थ्याला अदा केली जाईल. त्या व्यतिरिक्त बँकेने इतर कोणतेही जादा शुल्क, चार्जेस आकारल्यास लाभासाठी अनुज्ञेय राहणार नाहीत.

**अमृत गट परशुराम कर्ज व्याज परतावा योजना**

**योजनेचा उद्देश :** राज्यात खुल्या प्रवर्गातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, अमृतच्या लक्षित प्रवर्गातील उमेदवारांचे गटांना सामूहिक उद्योग / व्यवसाय उभारणीसाठी चालना देणे, त्यासाठी व्याज परतावाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देणे, स्वयंरोजगार व रोजगारक्षम कल्पनांना मूर्तरूप देण्यात हातभार लावणे.

**योजनेचा लक्ष गट :**

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळा मार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित लाभार्थी गटातील उमेदवारांचे गट जे स्वत:चा उद्योग / व्यवसाय सुरु करू इच्छितात.

**लाभार्थी निवड निकष :**

१. अर्जदार हा नोंदणीकृत गट असणे बंधनकारक राहील.

सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे गट या योजनेस पात्र राहतील.

अ. शासकीय योजनेसाठी मान्य असलेले, शासनमान्य बचत गट.

ब. निबंधक, भागीदारी संस्था महाराष्ट्र राज्य यांचेकडील नोंदणीकृत भागीदारी संस्था

क. जिल्हा उपनिबंधक यांचे कडील नोंदणीकृत सहकारी संस्था.

ड. कंपनी कायदा, २०१३ नुसार कंपनी / Limited Liability Partnership (LLP/Society).

इ. शासनाच्या आत्मा संस्थेकडे नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संघ (FPO) / शेतकरी उत्पादक कंपनी (FPC)

२. अर्जदार गटातील किमान ५० टक्के सदस्य अमृत

संस्थेच्या लाभार्थी निवडीच्या सर्व निकषांची पूर्तता करणारे असणे बंधनकारक आहे.

३. अर्जदार गटाच्या नोंदणी प्रमाणपत्राची स्व स्वाक्षरीत प्रत जोडावी

४. अर्जदार गटाच्या वतीने गटाचे अधिकृत पदाधिकारी यांना योजनेबाबत सर्व पत्रव्यवहाराचे व कार्यवाहीचे अधिकार दिले असल्याबाबत गटाच्या ठरावाची प्रत जोडावी.

५. गटाने / गटातील सदस्याने उद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले असल्यास त्याच्या प्रमाणपत्राची स्वस्वाक्षरीत प्रत जोडावी.

६. अर्जदार गटाने कायदेशीरदृष्ट्या उद्योग / व्यवसायासाठी आवश्यक असणारे सर्व वैध परवाने (Valid Licenses), उद्यम-आधार प्रमाणपत्र इ. प्राप्त करून त्याच्या स्वस्वाक्षरीत प्रती जोडाव्यात.

७. गटाच्या उद्योग व्यवसायाच्या टॅन / पॅनकार्डची स्व स्वाक्षरीत (Self-Attested) प्रत

८. कर्ज प्रकरण केलेल्या बँकेत गटाचे संयुक्त बचत बँक खाते असावे.

९. गट कोणत्याही बँकेचा / वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**योजनेच्या इतर अटी व शर्ती :**

१. अर्जदार गटाने कर्ज प्रकरण भारतीय रिझर्व्ह बँकेने उद्योग / व्यवसाय प्रयोजनासाठी कर्ज वितरणासाठी परवाना दिलेल्या राष्ट्रीयकृत बँक / सहकारी बँक / जिल्हा मध्यवर्ती बँक / शेड्युल बँक / खाजगी बँक इ वित्तीय संस्था यांचेकडे करणे आवश्यक राहील.

२. या योजनांतर्गत गटातील सदस्यांना परशुराम गट व्याज परतावा योजने व्यतिरिक्त अमृतच्या इतर व्याज परतावा योजनांचा लाभ मिळणार नाही.

३. लाभार्थी गटाने नियमितपणे सव्याज कर्जफेड करणे आवश्यक, नियमित कर्जफेड होत नसल्यास व्याज परतावा दिला जाणार नाही.

**अर्ज करण्याची पध्दत :**

१ इच्छुक अर्जदार गटांनी अमृत संस्थेच्या संकेतस्थळावर www.mahaamrut.org.in ऑनलाईन अर्ज करावेत. त्यासोबत आवश्यक कागदपत्रे / दस्तऐवज अपलोड करावेत. अर्जाची हार्ड कॉपी स्वाक्षरीत करून त्यासोबत आवश्यक सर्व दस्तऐवज / कागदपत्रे साक्षांकित (Self - Attested) करून अमृत कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

१. बँकेने दिलेल्या कर्जाच्या EMI Statement मधील वेळापत्रकानुसार लाभार्थ्याने नियमितपणे व वेळेवर कर्जाचे सव्याज हप्ते भरल्यास, त्यातील केवळ व्याजाची रक्कम (बँकेने आकारलेला व्याज दर अथवा उच्चतम मर्यादा १२% यापैकी किमानच्या मर्यादेत) लाभार्थी गटाच्या त्याच बँकेतील संयुक्त बचत खात्यात दर तीन महिन्याने जमा केली जाईल.

२. या योजनेत व्याज परतावा उच्चतम मर्यादा १२% व परताव्याचे रकमेची उच्चतम मर्यादा रु. १५.०० लाख (अक्षरी रुपाये पंधरा लाख फक्त) यानुसार मर्यादित राहील.

३. अमृत द्वारा लाभार्थी गटाने केवळ व्यवसाय / उद्योग यासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कम लाभार्थी गटाला अनुज्ञेय राहील, त्या व्यतिरिक्त इतर कोणेतेही अतिरिक्त शुल्क, चार्जेस लाभासाठी अनुज्ञेय नाहीत.

वरील दोन्ही योजनांमध्ये जर हप्ता नियमित भरता आला नाही तर अर्जदाराने ताबडतोब अमृतच्या निर्दशनास आणून देणे आवश्यक आहे. मग अमृत कारणमीमांसा बघून योग्य तो निर्णय घेईल आणि जर कारणमीमांसा मेनी झाली तर, हप्ता न भरण्याचा कालावधी वगळून पुन्हा हप्ता भरायला सुरुवात केल्यावर व्याज परतावा सुरू होईल.

पहिल्या योजनेत कुटुंबातील एकालाच लाभ घेता येईल आणि दुसऱ्या योजनेत गटाला एकदाच लाभ घेता येईल.

मला विश्वास आहे की ब्राह्मण उद्योजक वरील सवलतींचा फायदा उठवतील.

**– श्रीकांत शिंत्रे,**

मोबा. ९६१९१९६७०५

### कोल्हापूर चित्पावन, मंगलधाम आणि पंचरत्न वधूवर संस्थेतर्फे

# राज्यस्तरीय वधूवर मेळावा




ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, पंचरत्न वधूवर संस्था आणि कोल्हापूर चित्पावन संघाच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १८ मे २०२५ रोजी राज्यस्तरीय वधूवर मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या श्रीमती पद्मजा रविंद्र आपटे यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलनाने करण्यात आले. सर्व सहभागी संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी मेळाव्यास उपस्थित होते. संपूर्ण महाराष्ट्रातून व संलग्न संस्थांमधून मेळाव्यासाठी वधूवरांची नोंदणी झाली होती. तर या मेळाव्यात सुमारे १५० मुले आणि ७५ मुली प्रत्यक्ष सहभागी झाल्या होत्या.



# विविध गुणगौरव व सत्कार समारंभ

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे विविध गुणगौरव व मान्यवरांचा सत्कार समारंभ शनिवार, दि. २६ जुलै रोजी सायंकाळी ८ वाजता होणार असून या समारंभासाठी प्रमुख पाहुणे मा. जयवंतराव बर्वे हे लाभले आहेत. श्री. बर्वेसाहेब उच्चविद्याविभूषित असून त्यांनी NCL पुणे येथे संशोधन आणि मॉडर्न कॉलेज, पुणे येथे प्राध्यापक म्हणून काम केले असून गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ ऑरगॅनिक फार्मिंगमध्ये संशोधनात्मक कामगिरी केली आहे. शेती संशोधन, पारंपरिक शेती पद्धती, शेतीविषयक मार्गदर्शन अशा महत्त्वाच्या कार्यास त्यांनी वाहून घेतले आहे. आजवर त्यांना मराठा चेंबर ऑफ कॉमर्स पुरस्कार (१९७७), फाय फाऊंडेशन पुरस्कार (१९९६), मोरोपंत पिंगळे गोसेवा पुरस्कार (२०१२), उद्योगश्री पुरस्कार (२०१३), ॲग्रोवन बिझनेस ॲवॉर्ड फॉ ऑरगॅनिक फार्मिंग (२००९) अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आकाशवाणी व दूरदर्शनवरही नियमित त्यांचे शेतीविषयक मार्गदर्शनपर कार्यक्रम होत आहेत.

श्री. बर्वे साहेबांच्या हस्ते वे.मू.महादेव वासुदेव जोशी तथा बिडकर गुरुजी (वैदिक सन्मान), श्रीमती वैशाली वसंत पोंक्षे (आदर्श माता), सौ. जयश्री केशव भागवत (सामाजिक कार्यकर्ती), श्री. समीर देशपांडे-लोकमत (पत्रकार सन्मा) यांचेसह श्री. केशव दत्तात्रय भावे (भावे काका) आणि दिगंबर कृष्णाजी जोशी (डी.के.) यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

**सभासदांच्या माहितीसाठी :** कोल्हापूर चित्पावन संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ब्राह्मण सभा, करवीर, मंगलधाम येथे आयोजित करण्यात आली असून या सभेपूर्वी त्याच ठिकाणी सकाळी १० वाजता श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येणार आहे, याची कृपया सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

# युध्द फक्त सीमेवर लढले जात नाही.

युध्द फक्त सीमेवर लढले जात नाही. खरे युध्द तर आयडियांचे, विचारांचे युध्द असते. पाकिस्तान सारखा देश अतिरेकी कारवायांना रसद का पुरवतो? या देशाचे दोन तुकडे का पडतात आणि आणखी काही तुकडे पडतील, अशी परिस्थिती का निर्माण होते? पाकिस्तानात लोकशाही का रुजत नाही? पाकिस्तान हे फेल्ड, अगदी शब्दशः गर्तेत कोसळलेले स्टेट का आहे? या सगळयाचे कारण आहे – धर्मावर आधारित राष्ट्रउभारणी ! एकाच मध्यरात्री निर्माण झालेले दोन देश – भारत आणि पाकिस्तान. एक पहाटेकडे चालत राहतो, एकाची मध्यरात्र संपतच नाही. काळोख आणखी गडद होत जातो.

कारण एकच, आपण राष्ट्रबांधणीचे महत्व ओळखणारा सेक्यूलर, धर्मनिरपेक्ष भाव ओळखत आधुनिक जगाची रीत अवलंबली. समता, सहभाव, स्वातंत्र्य या मूल्यांना अंगिकारणारे संविधान सोबत घेऊन निघालो म्हणून तर खंडप्राय असूनही, इतकी विविधता असूनही आपण पुढे पुढे जात राहिलो. अडचणी येऊनही आपण संविधानाची पहाटवाट सोडली नाही. आपण प्रत्येक धर्माचा आदर केला पण त्याला राष्ट्र उभारणीच्या प्रकल्पात ढवळाढवळ करू दिली नाही.

पाकिस्तान धर्मांध शक्तींच्या हातात गेला आणि त्याचे होकायंत्रच बिघडले. स्वतःचे संविधानही त्यांना धड लवकर तयार करता आले नाही. अंतिम संविधान निर्माण व्हायला पार १९७३ साल उजाडले.

हे घडले केवळ धर्माच्या राजकारणातील हस्तक्षेपामुळे ! काल हिलाल अहमद या राफेल फायटरच्या नेतृत्वाखाली आपल्या सैन्याने पाकव्याप्त काश्मिरमधील अतिरेक्यांची ठाणकी उध्वस्त केल्याची बातमी हा आपल्या राष्ट्रीय सामर्थ्याचा केवळ एक भाग आहे. हे सामर्थ्य ज्यामुळे आपल्याला मिळाले ते खरेखुरे सामर्थ्य दिसले सेनेच्या प्रेस कॉन्फरंस मध्ये ! आपल्या सैन्याची कारवाई आपल्याला समजावून सांगत होत्या दोन महिला. एक हिंदू – विंग कमांडर व्योमिका सिंह, एक मुस्लिम – कर्नल सोफिया कुरेशी!

पाकिस्तानला आपण सर्व बाबतीत चारीमुंडया चीत का करू शकतो, याचं उत्तर या प्रेस कॉन्फरंसच्या अप्रतिम चित्रात प्रतिबिंबित झालं आहे. इथले सारे धर्म प्रेम आणि जिव्हाळ्याने एकत्र बांधले गेले आहेत. आणि हा एकत्र बांधणारा धागा आहे निखळ भारतीयत्वाचा. इथले संविधान आपल्या जगण्याला प्रगतीची वाट दाखवेल हा विश्वास इथल्या प्रत्येक भारतीयात आहे मग तो कोणत्याही धर्माचा असो. तुम्ही भले धर्म विचारून आम्हाला गोळ्या घाला, पण म्हणून आम्ही आमचे हिंदू मुस्लिम ध्रुवीकरण होऊ देणार नाही. ही प्रेस कॉन्फरन्स काहीच न बोलता हा महत्वाचा मेसेज सर्वदूर पोहचवते.

सोफिया म्हणजे बुध्दी आणि या बुध्दीच्या आधारे आकाशात विहार करणारी आकाश कन्या म्हणजे व्योमिका. एक कर्नल तर एक विंग कमांडर. एक उंच आभाळात तर एक जमिनीवर घट्ट पाय रोवून!

या दोघीजणी म्हणजे जुनाट बुरसटलेल्या धार्मिक दोरखंडात बायकांना बांधू पाहणाऱ्या धर्मांधांसाठी खराखुरा सर्जिकल स्ट्राईक आहे. या दोघी म्हणजे भारतीय संविधानाने दिलेले प्रकाशमान आश्वासन आहे. हे आभाळव्यापी आश्वासन उच्चारण्याची ताकद देखील पाकिस्तानमधे नाही. पाकिस्तानचा खरा पराभव आहे तो हा ! फायटर विमाने, क्षेपणास्त्रे, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे हे सारे महत्वाचे खरेच ! पण त्या साऱ्याहून अधिक महत्वाचा आणि सामर्थ्यशाली असतो त्या आयुधांच्या मागे उभा असणारा माणूस आणि अवघं माणूसपण कवेत घेणारे त्याचं विशाल हृदय. आपली ही खरीखुरी ताकद आपण ओळखली पाहिजे, जपली पाहिजे.

**– प्रदीप आवटे**

# उत्तर एका गंभीर प्रश्नाचे !

**एवढी मंदिरे उद्ध्वस्त होईपर्यंत देव झोपले होते काय की पळून गेले होते? या सेक्युलर प्रश्नाचे मुद्देसुद उत्तर –**

१) देव जरी असला तरी त्याला नियतीत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नसतो! (गुरुचरित्र अध्याय ३६, ३७, ३८)

२) कलियुग पृथ्वीवर येण्याअगोदर त्याने स्वतःच्या अटी ब्रह्मदेवाकडून मान्य करवून घेतल्या त्यानुसार

अ) कलियुगात देव, दानव, भुतं, नाग, यक्ष, किन्नर, यक्षिणी आणि पिशाच्च यांना सदेह येवून काम करता येणार नाही व स्वहस्ते चमत्कारही!

आ) त्यानुसार सर्व गणांना म्हणजे देवादिकांसह दानव भुतं नाग इत्यादींना काहीही कार्य किंवा घातपात करायचा असल्यास कालात्मा व काम यांच्या सहाय्याने मनुष्याच्या मन व शरीरावर ताबा मिळवून मनोकायिक बदल घडवून मनुष्यांच्याच हातून ते सगळे कार्य करणे भाग आहे!

३) पांडवांचा नातू परिक्षित राजा नंतर कलियुग सुरू होवून सुमारे ५००० वर्षे झाली आहेत फक्त ! श्री कृष्ण अवतार समाप्तीनंतर त्यांनी पुढचा अवतार श्री विठ्ठल स्वरूपात घेऊन आपले कार्य करण्यासाठी नव नारायणांचे अवतार नवनाथ व त्यांचे ८४ सिद्ध शिष्य यांची उपाययोजना केली आहे. (संदर्भ श्रीमद्भागवत, नवनाथ कथासार, गुरुचरित्र, विठ्ठल माहात्म्य)

४) स्वतः कलीने विठ्ठल रुक्मिणी यांना समोरासमोर पाहिल्यावर त्याची लंपट वासना रुक्मिणीवर स्थिर झाली व रुक्मिणीला त्याने विठ्ठलासमोर प्रपोज केलं! विठ्ठलाने ही तुझी आजी आहे हे सांगूनही त्याची भ्रष्ट मती सुधारली नाही! त्यानंतर त्याने रुक्मिणीचे अपहरण करण्याचे प्रयत्न सुरू केले. परंतु चिरंजीव हनुमान, नवनाथ व सिद्ध गण यांच्यापुढं त्याचा टिकाव लागला नाही!

५) मार खावून पळून गेलेल्या कलीने शुक्राचार्यांना गाठलं, त्यांच्या साहाय्याने मरुप्रदेशात (सौदी अरेबिया) लपून बसलेल्या शूर्पणखेला शोधून नवीन यवन व म्लेंच्छ संप्रदाय स्थापन करून त्यांना जन्मतःच वैदिक सनातन श्री धर्म व हिंदू संस्कृती विषयी विष पेरले जाईल याची दक्षता घेतली! कारण माता रुक्मिणीसाठी विठ्ठल व कली हा संघर्ष कलियुग अंतापर्यंत म्हणजे चार लाख बत्तीस हजार वर्षे चालू रहाणार आहे! त्यातली फक्त पाच हजार वर्षे संपली आहेत! कली वेगवेगळ्या मार्गाने भारत, वैदिक सनातन श्री धर्म व हिंदू संस्कृती यांना नष्ट करण्यासाठी शेकडो प्रयत्न करत रहाणार आहे! कारण धर्माचा उच्छेद व अधर्माचे राज्य हे कलीचे ब्रिद वाक्य आहे ! (संदर्भ – भविष्योत्तर पुराण, कल्की पुराण, गरुड पुराण)

६) सुमारे २५०० वर्षे भारतात नाथ पंथ अतिशय प्रबळ व शक्तिशाली होता तोवर कली शुक्राचार्य शूर्पणखा यांनी पाठवलेल्या यवन व म्लेंच्छ आक्रमणाला भारतीय राजे त्यांच्या मागे असलेल्या नवनाथ व ८४ सिद्धांच्या सहकार्य व आशीर्वादामुळे नेहमी पराजीत करत गेले व भारतीय संस्कृती कलियुग सुरू असताना ही सुमारे २५०० वर्षे प्रबळच राहीली. (संदर्भ – भविष्योत्तर पुराण, कल्की पुराण, गरुड पुराण)

७) त्यानंतर सुमारे १३ व्या शतकात श्री कृष्ण यांचे काका भक्तराज उद्धव यांचा पुनर्जन्म होवून जन्मलेल्या संतश्रेष्ठ कबीर या रामभक्ताला एकदा खूप काळ उपवास घडून पाणी देखील मिळाले नव्हते. त्या मरणप्राय अवस्थेत त्यांना चौदा वर्षांच्या एका म्लेंच्छ चांभार मुलाने पाणी दिले व जेवणही! भक्तराज कबीर यांनी त्या मुलाला व त्याच्या आईला स्वतःविषयी सर्व हकीकत सांगितली व पाणी व जेवणाच्या बदल्यात काहीतरी वर मागायला सांगितले! (परंतु तो मुलगा कली स्वतः होता व आई शूर्पणखा होती) त्या मुलाने व आईने कबीराकडे वर मागितला की पुढच्या सात पिढ्या त्यांचे संपूर्ण भारतात निष्कंटक राज्य असावे! त्यांना देवादिकांसह कुणीही हरवू शकणार नाही असा वर मागितला! हा वर ऐकून कबीरांना स्वतः दशरथासारखे स्वतःच्याच वचनात कैद झाल्याची जाणीव झाली पण तोवर उशीर झाला होता! (संदर्भ – भक्ती विजय, भविष्य पुराण, कल्की पुराण)

८) कबीरानी नाईलाजाने त्या मुलाला वर दिला की

तुझ्या संप्रदायाच्या सात पिढ्या व ३०० पेक्षा जास्त वंशज बादशहा व राज्यकर्ते बनुन भारतावर राज्य करतील! पण जाताजाता कबीराने त्याच्या (कलीच्या) कमरेत लाथ घातली व शाप दिला की देव दानव भुतं नाग यक्ष किन्नर यक्षिणी व गंधर्व जरी काही करू शकत नसले तरी नवनाथ व त्यांचे सिद्ध तसेच देवतांचे मनुष्य रूपातील अंशावतार संपूर्ण यवन व म्लेंच्छ सत्तेशी लढा देतील! आणि शेवटी यवन व म्लेंच्छ आपसात लढून मरतील व कली-शुक्राचार्य-शूर्पणखा यांचा दारुण पराभव होईल. (संदर्भ - भक्ती विजय, भविष्य पुराण, कल्की पुराण)

९) कबीर हे सच्चे रामभक्त होते त्यामुळे त्यांच्या वराचा पहिला फटाका श्री रामांनाच बसला व भक्तासाठी श्री रामांनीही तो स्वीकारला व स्वतःचे अयोध्येतील मंदिर उद्धवस्त होण्याअगोदरच महंतांना सूचित करून मध्यरात्री मंदिरातील मूर्ती शरयू नदीमध्ये लपवल्या! त्यानंतर सर्व भारतभर कलीने त्याच्या पंथांमार्फत हौदौस घातला! मंदिरे पाडली, ब्राह्मण पुजारी व नवनाथ पंथीय साधूंची बेसुमार हत्या केली! खासकरून ब्राह्मण यांविषयी आकस निर्माण करण्यासाठी समाजात जन्मतः सनातन श्री धर्म, हिंदू संस्कृती, गायी, मंदिरे व ब्राह्मण यांच्याविषयी आकस निर्माण होईल असे तथाकथित धर्म, संप्रदाय व वर्ग विशेषच तयार केले व कामाला लावले जे आजही अस्तित्वात आहेत. (संदर्भ - भविष्य पुराण, कल्की पुराण, भविष्योत्तर पुराण)

१०) कबीराने दिलेल्या वरानुसार यवन व म्लेंच्छांच्या सात पिढ्या व तीनशे पेक्षा जास्त वंशज बादशहा व राज्यकर्त्यांनी तेराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत सातशे वर्षे भारतावर राज्य केले! कबीरांचा वर पूर्ण झाल्याने श्रीरामांना व सर्व देवादिकांना आयोध्येत येण्याचा मार्ग प्रशस्त झाला! व त्या नुसार ते पुन्हा वैभवशाली ऐश्वर्यासहीत आपल्या सिंहासनावर विराजमान झाले आहेत! म्हणूनच त्यांना तेराव्या शतकापासूनच रामलल्ला विराजमान अशी उपाधी दिली गेली आहे! (संदर्भ - भविष्य पुराण, कल्की पुराण, भविष्योत्तर पुराण)

११) आता कुठं भारताचे खरे वैभवशाली ऐश्वर्याचे दिवस सुरू झाले आहेत! पुढे जे काही होणार आहे त्यामुळे भारत पुन्हा एकदा विश्वगुरु होईल हे निश्चित आहे! हे सर्व काही म्लेंच्छ व यवन यांना पूर्णपणे माहिती आहे म्हणूनच सर्व जगाचा व भारतीय कली जनांचा अजूनही श्री रामलल्ला विराजमान आणि अयोध्या मंदिराला आजही कायम विरोधच आहे!

कारण - अयोध्या तो झांकी है
काशी, मथुरा अभी बाकी है!

नोट - सर्व संबंधित संदर्भांसाठी कृपया जर्मनी येथील नॅशनल लायब्ररीचे अर्कायविंग आभ्यासावे! भारतातून ब्रिटिशांनी चोरून नेलेल्या सर्व ओरिजनल हस्तलिखित ग्रंथांच्या प्रती आज युरोपात आहेत! त्यामुळे त्या जसल्या तशा सुरक्षित तरी आहेत! भारतात तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी भेसळ केलेले भ्रष्ट ग्रंथ उपलब्ध आहेत जे संदर्भ देण्यासाठी योग्य नाहीत!

(आंतरजालावरून साभार)

# ऋतू बरवा... शरद

**पान ६ वरून...**

चित्रपट निर्मिती अन् पर्यटन याचा आत्मा आहे. या ऋतू रंगाबद्दल लिहावं तितकं कमीच पडेल. शरद ऋतूचे वर्णन करणारी एक रामचरीतमानस मधली एक चौपाई आहे...

**बरषा बिगत सरद रितु आई।**
**लछमन देखहु परम सुहाई।।**
**फूलें कास सकल महि छाई।**
**जनु बरषाँ कृत प्रगट बुढ़ाई।।**

अर्थ : पावसाळा संपला आहे आणि सर्वात सुंदर शरद ऋतू आला आहे. संपूर्ण पृथ्वी बहरलेल्या फुलांनी व्यापलेली . जणू काही पावसाळ्याने आपले म्हातारपण (गवतासारखे पांढरे केसांच्या रूपात) प्रकट केले आहे...

असा हा शरद ऋतू आपल्याला नवचैतन्याची आस लावतो हेच खरं !

**- वैदेही जोशी,** मोबा. ९५४५६३५४६५

**कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर**

# शैक्षणिक पारितोषिक योजना २०२५-२०२६

**(फक्त सभासदांचे मुलामुलींसाठीच)**

## शैक्षणिक अर्हता व बक्षिसे

१. **प्राथमिक शाळा स्तर –** १ ली ते ४ थी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

२. **माध्यमिक –** ५ वी ते ९ वी वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

३. **स्कॉलरशिप परीक्षा –** ४ थी व ७ वी परीक्षेत यश मिळविणाऱ्यांना बक्षिसे.

४. **हायस्कूल स्तर/एस.एस.सी. –** इयत्ता १० वी स्तरावर प्रथम येणारी मुलगी, प्रथम येणारा मुलगा, तसेच इंग्रजी, गणित, संस्कृत व मराठी या विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

५. गणित प्रज्ञा परीक्षा, MTS, NTS परीक्षा इ.क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

६. **कनिष्ठ महाविद्यालय/एच.एस.सी. –** इ. १२ वी (तीनही शाखा) मुलांत प्रथम, मुलीत प्रथम, तसेच इंग्रजी, गणित आणि संस्कृत विषयात सर्वोत्तम गुण प्राप्तीसाठी बक्षिसे.

७. **पदवी स्तर –** कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीन विद्याशाखांत तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्यांना बक्षिसे.

८. **पदव्युत्तर स्तर –** कला, शास्त्र, वाणिज्य, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखांत तसेच एम.सी.ए. मध्ये प्रथम येणाऱ्या पाल्यांसाठी बक्षिसे.

९. **विशेष बक्षीस योजना –** एमबीबीएस, एम.टेक., सीए, आयसीडब्ल्यूए. तसेच ललित कला, संगीत कला, वक्तृत्व कला, क्रीडा, चित्रकला इत्यादी क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या पाल्यांना बक्षिसे.

१०. **पत्रकारिता शिक्षणासाठी उत्तेजनार्थ बक्षीस**

मागील वर्षापासून बक्षिसामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

११. **इ. १ ली ते ९ वी –** प्रत्येकी तीन क्रमांक. **१२. इ. ४ थी व इ. ७ वी –** स्कॉलरशिप – प्रत्येकी तीन क्रमांक.

१३. **इ. १० वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम, २. विषयवार बक्षिसे (प्रथम व द्वितीय)
अ. इंग्रजी, ब. गणित, क.संस्कृत, ड.मराठी, इ. विज्ञान

१४. **इ. १२ वी –** १. विद्यार्थ्यांत प्रथम व विद्यार्थिनीत प्रथम (शाखानिहाय),
२. विषयवार (शाखानिहाय – प्रथम व द्वितीय) –
अ. इंग्रजी, ब.गणित, क.संस्कृत, ड. विज्ञान,

१५. **शाखानिहाय पदवीधर –** आर्टस्, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरींग, मेडिकल, एल्.एल्.बी.

१६. **पदव्युतर –** एम्.ई. एम्.टेक्., सर्जरी, एल्एल्.एम्., एम्.ए. एम्.कॉम, एम्.एस्सी., एम.बी.ए., सी.ए.,UPSC, MPSC

१७. **प्रवेश परीक्षा –** सी.ए.(CPT) एन.डी.ए.(Foundation) आय.आय.टी. (JEE) आय.सी. डब्ल्यू, व सी.एस्.(Foundation) **१८.** गरजू, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनी–इ.१० व १२वी

१९. **सभासदांकरिता –** वक्तृत्व, संगीत, पाककृती, नृत्य, गायन, वादन किंवा सर्व क्षेत्रातील कलाकौशल्यासाठी विशेष बक्षिसे २०. **पत्रकारिता –** १. शिक्षण २. विशेष योगदान

**संस्थेकडील विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून आवश्यक ते कागदपत्रे जोडून कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालयात ता. 15 जुलै 2025 पर्यंत जमा करावेत. संघाची कार्यकारिणी तसेच शैक्षणिक समिती पारितोषिकांबाबत योग्य निर्णय घेईल. अर्जदार (पालक) संघाचे सभासद असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

## भावपूर्ण श्रद्धांजली !



कोल्हापूर चित्तपावन संघाचे उपाध्यक्ष प्रसाद
भिडे यांच्या मातोश्री
सौ. आशा प्रभाकर भिडे यांना
बुधवार, दि. २१ मे रोजी पहाटे तीन वाजता
वयाच्या ८७ व्या वर्षी
वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो आणि
भिडे कुटुबियांना मातृवियोगाचे दुःख सहन
करण्याची शक्ती देवो
ही विधात्याच्या चरणी प्रार्थना !
कोल्हापूर चित्पावन संघ परिवार

## भावपूर्ण श्रद्धांजली !



कोल्हापुरातील प्रख्यात नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.अतुल मधुकर जोगळेकर यांचे निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. गरीब रुग्णांवर अल्पदरात उपचार करणारे, रुग्णांची सेवा हाच खरा धर्म मानणारे डॉ. जोगळेकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य कोल्हापूर, कर्नाटक आणि कोकणातील असंख्य रुग्णांचे दृष्टीसौंदर्य उजळवण्यात समर्पित केले. या दुःखद प्रसंगी आम्ही जोगळेकर कुटुंबियांच्या सोबत आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, हीच प्रार्थना!
कोल्हापूर चित्पावन संघ परिवार, कोल्हापूर.

भावपूर्ण श्रद्धांजली !



### एका चित्पावनी युगाचा अंत..

बेळगावच्या उद्योग आणि आर्थिक क्षेत्रातील सन्मानजनक व्यक्तीमत्व... आदरणीय गोविंदराव फडके यांचे बेळगाव येथील स्वगृही दुःखद निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते. चित्पावन ब्राह्मण संघ बेळगाव, अखिल कर्नाटक चित्पावन ब्राह्मण संघाचे ते अध्यक्ष होते. अखिल भारतीय चित्पावन ब्राह्मण संघाचे उपाध्यक्ष होते. परोपकार आणि कळवळा हे त्यांचे अंगभूत गुण! समोरच्या व्यक्तीची गरज ओळखून, आपणहून मदत करण्याची त्यांची वृत्ती ही वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्या निर्गमनाने, त्यांना मानणाऱ्यांना, चिरंतन शोकाला सामोरे जावे लागणार आहे...
ईश्वर मृतात्म्यास शांती देवो हीच प्रार्थना... !

## कोल्हापूर चित्पावन संघाच्या वर्धापन दिनानिमित्त आरोग्यविषयक 'हेल्थ इज वेल्थ' कार्यक्रम




कोल्हापूर चित्पावन संघाच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त रविवार, दि. १ जून २०२५ रोजी आरोग्य सुधारणेसाठीचा 'हेल्थ इज वेल्थ' हा कार्यक्रम घेण्यात आला. श्री. महेश आपटे यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमात डाएटबद्दलच्या टीप्स, वेट लॉस, वेट गेन, मसल गेन याबद्दलचे समज-गैरसमज, आहार कसा असावा, निरोगी मन कसे राखावे यासह आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार श्री. प्रसाद भिडे यांनी केले.

हीरकमहोत्सवी



## कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)

**कोल्हापूर.**

## विविध गुणगौरव व सत्कार समारंभ २०२५

सस्नेह निमंत्रण

| आदर्श माता | वैदिक सन्मान |
|---|---|
| **श्रीमती वैशाली वसंत पोंक्षे** | **वे.मू.महादेव वासुदेव जोशी तथा बिडकर गुरुजी** |
| सामाजिक कार्यकर्ती | पत्रकार सन्मान |
| **सौ. जयश्री केशव भागवत** | **श्री. समीर देशपांडे, लोकमत** |

विशेष सत्कार

**श्री. केशव दत्तात्रय भावे (भावेकाका)**

**श्री. दिगंबर कृष्णाजी तथा डी. के. जोशी**

प्रमुख पाहुणे : **मा. जयंतराव वामन बर्वे**

**प्रसाद भिडे** - उपाध्यक्ष **मकरंद करंदीकर** - अध्यक्ष

**केदार जोशी** - सचिव

सर्व संचालक मंडळ - कोल्हापूर चित्पावन संघ

सर्व संचालक मंडळ - परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

**शनिवार, दि. २६ जुलै २०२५ रोजी सायं. ४ वाजता**

**स्थळ : ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, कोल्हापूर.**

## भारत नृत्य महोत्सव स्पर्धेत सेमी क्लासिकल गटात मुग्धा पटवर्धन हिचे यश !



गोवा कला अकॅडमी, पणजी येथे अखिल नटराजम् आंतर सांस्कृतिक संघ, नागपूर यांच्या वतीने झालेल्या इंटरनॅशनल डान्स स्पर्धा व फेस्टिव्हल अंतर्गत झालेल्या भारत नृत्य महोत्सव स्पर्धेत सेमी क्लासिकल डान्स गटात आपल्या चित्पावन संघाचे सदस्य सौ. वृषाली व श्री. महेश पटवर्धन यांची कन्या कु. मुग्धा हिने ९ ते १६ वयोगटात सेमी क्लासिकल प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. त्याबद्दल मुक्ता हिचे अभिनंदन !

## कोल्हापूर चित्पावन संघाचा सार्वजनिक बोडण सोहळा संपन्न

चित्तपावन समाजाचा कुलाचार म्हणजे 'बोडण सोहळा'. या वर्षी सार्वजनिक बोडण सोहळा दि. २५ मे, २०२५ रोजी पार पडला. एकूण चार बोडणे करण्यात आली.



• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027

ISO 9001-2008
UL Approved

# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO

TÜV CERT
DIN EN ISO 9001:2000
C-DOT
R.D.S.O.




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.